**निशाणी क्र. ७ वरील आदेश**

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर नेमणूकीकरीता दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १अ, १क, १ड, २ व ३ यांनी निशाणी १९ वर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. सदर म्हणण्यामध्ये त्यांनी ७/१२ पत्रकाची दुरुस्ती होवून मिळण्याकरीता तहसिलदार, माढा यांच्याकडे अर्ज दाखल केला असून तो प्रलंबित आहे. प्रतिवादीचे मुळ खरेदीखत दि.२२/०६/१९५९ मध्ये नमूद ८ एकर ३ गुंठे क्षेत्रावर त्यांची आजही वहीवाट आहे. या परिस्थितीत, सदर कमिशन अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे.

०३. प्रस्तुतचे प्रकरण वादी यांनी दावा मिळकतींची मोजणी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केले आहे. मौजे केवड, ता.माढा, जि.सोलापूर येथील गट क्र. २६८ व २७० ही वादी यांची प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीची मिळकत आहे. प्रतिवादी क्र. १ व त्यांचे वारस प्रतिवादी क्र. १अ ते १ड, २ व ३ यांची मुळ गट क्र. २६९ आहे. वादी क्र. १ व २ यांचे जमीन गट क्र. २६८ व प्रतिवादी क्र. १ व त्यांचे वारस प्रतिवादी क्र. १अ ते १ड, २ व ३ यांची गट क्र. २६९ यांचे दरम्यान पुर्व–पश्चिम चालीचा प्रतिवादीचे जमीनीचे उत्तरेकडील बाजूस बांध आहे. वादी क्र. ३ ते ६ यांची मुळ गट क्र. २७० व प्रतिवादी क्र. १अ ते १ड, २ व ३ यांचे गट क्र. २६९ चे दरम्यान पुर्व–पश्चिम चालीचा सदर प्रतिवादीचे जमीनीचे दक्षिणेकडील बाजूस बांध आहे. प्रतिवादी हे हद्दी–खुणाचे कारणांवरुन वारंवार वाद उपस्थित

करीत आहेत. सदर दोन्ही बांधास इजा होईल असे कृत्य करुन वादी यांचे जमीनीत वारंवार अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादी यांनी हद्दी–खुणा कामय होवून चतुःसिमा निश्चीत करणेबाबत प्रतिवादी यांचेकडे विचारणा केली असता प्रतिवादींनी नकार दिला. त्यामुळे, वादीने वर नमूद गटांची मोजणी होवून मिळण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी यांच्या कथनांप्रमाणे ७/१२ उता–यातील नोंदी चुकीच्या आहेत. त्यांनी सदर नोंदीच्या दुरुस्तीकरीता तहसिलदार, माढा यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रकरणी तसा अर्ज दाखल केल्याबाबतचे कागद अभिलेखावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले नाही. वादी यांनी दाखल केलेल्या एकत्रीकरण उता–यामध्ये सदर तीनही गट क्रमाकांच्या क्षेत्राचा उल्लेख केलेला आहे. आजमितीस, वादी व प्रतिवादी यांचे क्षेत्र त्यांचे ७/१२ पत्रकी नमूद नोंदीनुसार अभिलेखावर दाखल आहे. सदर नोंदी चुकीच्या ठरविण्याकरीता किंवा त्या नोंदी एकत्रीकरणावेळी चुकीच्या झाल्या या बाबींच्या अधिकारीता दिवाणी न्यायालयास नाही. प्रस्तुत प्रकरणी वादी यांनी केवळ उपलब्ध कागदपत्रानुसार मोजणी करुन हद्दी–खुणा दाखविण्याबाबत न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करण्याबाबत विनंती केली आहे. सदर न्यायालयीन आयुक्त यांनी मोजणी केल्यानंतर त्यामध्ये तथ्य आहे किंवा कसे तसेच वादीकडे त्या क्षेत्राची मालकी आहे किंवा कसे या बाबी सुनावणी वेळी ठरणार आहे. त्यामुळे, सदर मोजणी करण्याकरीता न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक केल्याने प्रतिवादीच्या बचावास कोणतीही बाधा येणार नाही. सबब, वरील प्रमाणे परिस्थिती असल्यामुळे, सदर गटांची मोजणी करण्याकरीता कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. सदर मोजणीचे आदेश दिल्यानंतर या प्रकरणी प्रत्यक्ष वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणार आहे. सबब, आदेश.

# आदेश

| | | |
|---|---|---|
| १. | उप–अधीक्षक भूमि अभिलेख, माढा यांचे या प्रकरणी कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते. | |
| २. | उप–अधीक्षक भूमि अभिलेख, माढा यांनी खालील कामाकरीता नियमानुसार योग्य त्या अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करून प्रस्तुत अर्जामध्ये नमुद उद्देश साध्य करण्याच्या अनुषंगाने वादाचे कायमचे निराकरण होण्याकरीता मोजणी करावी. | |
| | अ) | कोर्ट कमिशनर यांनी अर्ज कलम अ व ब मधील मौजे केवड येथील गट क्र. २६८ व २७० तसेच गट क्र. २६८ या गटाच्या उपगटांची मोजणी करुन त्यांचे सीमांकन करुन हद्दी खुणा नकाशावर दाखवावेत. |
| | ब) | सदर मिळकतीमध्ये कोणत्या धारकाचे किती क्षेत्रावर अतिक्रमण आहे, याचा सविस्तर तपशील द्यावा. |
| | क) | प्रस्तुत अर्जामधील उद्देश पार पाडण्यासाठी आवश्यक ती मदत करावी. |
| ३. | प्रस्तुत प्रकरणी वादी यांनी सदर मोजणीकरीता आवश्यक ती फी भरावी. | |
| ४. | सदरची मोजणीचा अहवाल या प्रकरणी दि.२२/०६/२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी दाखल करण्यात यावे. | |

LAMBE PRATIK GANESH

Digitally signed by LAMBE PRATIK GANESH
Date: 2026.04.22 11:34:05 +0530

**(पी.जी.लंबे)**

दिनांकः २२/०४/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माढा.